जालना
नायक




# ‘मत्स्योदरी’ मध्ये स्वच्छता अभियान

**जालना नायक वृत्त**

**जालना ।** शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसर हा स्वच्छ करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व महाविद्यालय स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. तसेच आपण दैनंदिन जीवनात एकदाच वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक चा वापर न करण्याचे सुद्धा आवाहन यावेळी केले. तसेच झाडांचा पालापाचोळा हा सेंद्रिय खत बनविण्यासाठी एका ठिकाणी एकत्र करण्यात आला.


यावेळी सर्व विभाग प्रमुख, रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. शेषनारायण घुंगरड, तंत्रनिकेतन प्रभारी प्रा. अविनाश दवणे, समन्वयक प्रा. पंकज भोयर, प्रा. नंदकिशोर वाघ, प्रा. जगदीश कायस्थ, प्रा. सुरज लोहकरे सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Main Edition
Oct 3, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

पुण्य नगरी

# महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

## जिल्हाभरात स्वच्छता अभियानासह विविध उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद



**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरासह जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, पक्ष, संघटना, सामाजिक संस्थांच्यावतीने सोमवारी (दि.२) राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच लालबहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त ठिकठिकाणी स्वच्छता अभियानाचे आयोजनही करण्यात ...

### मत्स्योदरी अभियांत्रिकीमध्ये स्वच्छता अभियान



**जालना:** शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसर हा स्वच्छ करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. महाविद्यालय स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. तसेच आपण दैनंदिन जीवनात एकदाच वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक चा वापर न करण्याचे सुद्धा आवाहन यावेळी केले. तसेच छात्रांचा पाल्यापाचोळा हा सेंद्रिय खत बनविण्यासाठी एका ठिकाणी एकत्र करण्यात आला. यावेळी सर्व विभाग प्रमुख, रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. लोकनारायण बुंदरड, तंत्रनिकेतन प्रभारी प्रा. अविनाश दळवे, समन्वयक प्रा. पंकज भोयर, प्रा. नंदकिशोर वाघ, प्रा. नागनाथ कावळे, प्रा. सुरज लोहकरे सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


### काँग्रेसच्यावतीने म.गांधी, शास्त्रींना अभिवादन

**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हा काँग्रेस ग्रामीण व शहर कमिटीच्यावतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती व स्व.लालबहादूर शास्त्री यांची जयंती सोमवार (दि.२) जुना जालना गांधी चमन चौकात साजरी करण्यात आली. प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या व स्व. लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी जिल्हा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद, प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश प्रवक्ते डॉ.संजय लाखे पाटील, प्रदेश सरचिटणीस कल्याण दळे यांनी यावेळी की, महात्मा गांधी यांनी देशाला अहिंसा, सत्यभावना आणि शांततेचा संदेश दिला. याप्रसंगी राम सावंत सुभाष कोळकर, शेख जाने जिल्हा उपाध्यक्ष शेख इब्राहीम, महिला काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्ष नंदाताई पवार, ॲड. राम कुऱ्हाडे, चंदाताई भांगडिया, मंजू वाघ, मंगलताई खांडेभराड, विमल आगळे, गुलजार शेख, सय्यद करीम बिल्डर, फकिरा वाघ, नारायण वाढेकर, शेख कलीम वाजेद घाटे, बाबासाहेब सोनवणे, योगेश पाटील, गणेश चांदोडे, सिराज पटेल, शेख इरशाद, गजानन सेलूकर, अनस चाऊस, रहीम तांबोळी, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



काँग्रेस पक्षाच्यावतीने चमन चौकात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित काँग्रेस पदाधिकारी.



व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**यशवंत विद्यालय, धावडा**

**धावडा** । येथील यशवंत विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी नाभिक सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विजय तायडे, प्राचार्य राहुल नर्वडे, विद्यालयाचे प्राध्यापक विनोद दुतोंडे, किशोर खरडे, ...

देशोन्नती

# मत्स्योदरी अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन मध्ये स्वच्छता अभियान



**जालना :** शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसर हा स्वच्छ करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व महाविद्यालय स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. तसेच आपण दैनंदिन जीवनात एकदाच वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक चा वापर न करण्याचे सुद्धा आवाहन यावेळी केले.

तसेच झाडांचा पालापाचोळा हा सेंद्रिय खत बनविण्यासाठी एका ठिकाणी एकत्र करण्यात आला.

यावेळी सर्व विभाग प्रमुख, रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. शेषनारायण घुंगरड, तंत्रनिकेतन प्रभारी प्रा. अविनाश दवणे, समन्वयक प्रा. पंकज भोयर, प्रा. नंदकिशोर वाघ, प्रा. जगदीश कायस्थ, प्रा. सुरज लोहकरे सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

संक्षिप्त

## मत्स्योदरी तंत्रनिकेतनतर्फे स्वच्छता अभियान

**जालना :** शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसर हा स्वच्छ करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. यावेळी रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी प्रा. शेषनारायण घुंगरड, तंत्रनिकेतन प्रभारी प्रा.अविनाश दवणे, समन्वयक प्रा. पंकज भोयर, प्रा. नंदकिशोर वाघ, प्रा. जगदीश कायस्थ, प्रा. सुरज लोहकरे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.